**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी अधिसूचित करण्यात आल्याबाबत निर्गमीत केलेल्या अधिसूचनेची अंमलबजावणी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आरटीएस-२०१८/प्र.क्र.१४५/आस्था.५**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१९.

<u>वाचा</u> : १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५, दिनांक २८ एप्रिल, २०१५
२) शासन निर्णय क्रमांकः आरटीएस-२०१५/प्र.क्र.३२/पं.रा-५ दिनांक १४ जुलै, २०१५

**<u>प्रस्तावना :</u>**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ च्या कलम-३ अनुसार अधिसूचित करावयाच्या सेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा याबाबतची अधिसूचना दिनांक १० जुलै, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेन्वये ग्रामपंचायत पातळीवरील १३ लोकसेवांच्या संदर्भातील पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. अधिसूचित करण्यात आलेल्या १३ सेवा या पात्र व्यक्तींना उपलब्ध करुन देण्याकरीता ऑनलाईन कार्यप्रणाली कार्यान्वित असेल, त्या ठिकाणी सदर सेवा संगणकीकृत प्रतींद्वारेही देण्यात येते व ज्या ठिकाणी ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित नाही, त्या ठिकाणी सदर सेवा संदर्भिय शासन निर्णयासोबत जोडलेल्या विहित नमुन्यांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येते. सद्यस्थितीत या विभागाने दिनांक१० जुलै, २०१५ च्या अधिसूचनेन्वये अधिसूचित केलेल्या १३ सेवांपैकी १० सेवा महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भात आढावा घेऊन दिनांक १२.२.२०१९ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत १३ ऐवजी ७ लोकसेवा विहित कालमर्यादेत देण्याचे निश्चित केले आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखाली राज्यातील सर्व ग्रामस्थांसाठीच्या ज्या सेवा महत्वाच्या आहेत अशा लोकसेवांची निश्चिती करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ च्या कलम-३(१) अनुसार अधिसूचित करावयाच्या सेवा,

पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा याबाबतची अधिसूचना दिनांक १२.२.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५च्या अनुषंगाने अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांबाबतची अंमलबजावणी करण्याच्यासंदर्भात उक्त दिनांक १४ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना दिनांक १२.२.२०१९ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचने-तील लोकसेवांकरिताही लागू राहतील.

त्याचप्रमाणे महसूल व वन विभागाकडून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवांमध्ये “तात्पुरते रहिवास प्रमाणपत्र” ही सेवा देण्यात येत असल्याने या विभागाकडून रहिवाशी दाखला देण्याची आवश्यकता नाही. तसेच (१) विधवा असल्याचा दाखला - यासाठी नवऱ्याच्या मृत्यु नोंद दाखल्यासोबत पुनर्विवाह न केल्याचे स्वघोषणापत्र घेण्यात यावे. (२) परितक्त्या असल्याच्या दाखला - यासाठी मा.न्यायालयाचे अथवा सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेशासोबत नवऱ्याने सोडल्याचे/ नवऱ्यास सोडल्याचे स्वघोषणापत्र घेण्यात यावे. (३) विभक्त कुटुंबाचा दाखला, (४) नोकरी व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र, (५) बेरोजगार प्रमाणपत्र, (६) हयातीचा दाखला, (७) शौचालय दाखला, (८) नळजोडणीसाठी अनुमती प्रमाणपत्र, (९) चारित्र्याचा दाखला, (१०) वीजेच्या जोडणीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र, (११) जिल्हापरिषद फंडातून कृषी साहित्य खरेदी, (१२) राष्ट्रिय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम, (१३) बचतगटांना खेळते भागभांडवल बँकेमार्फत कर्ज पुरवठा, (१४) कोणत्याही योजनेचा लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र (१५) निराधार योजनेसाठी वयाचा दाखला देण्याच्या सेवा यापुढे बंद करण्यात येत असून यासंदर्भाने ग्रामस्थांकडून सोबत जोडलेल्या नमुन्यातील स्वयंघोषणापत्र स्वीकारण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्रमांक २०१९०२१३१४५०२८७०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandit Jadhav

Digitally signed by Pandit Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=130c3faa5ebf138c8b39058785ac534c17d9b377a1b84b0b4d591d63ea56da06, cn=Pandit Jadhav
Date: 2019.02.14 10:43:09 +05'30'

**( पं. खं. जाधव )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.विरोधी पक्षनेते, विधान परिषद व विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानपरिषद / विधानसभा सदस्य व संसद सदस्य
३. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव
८. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९. सर्व विभागीय आयुक्त
१०.सर्व जिल्हाधिकारी
११.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२.सर्व मंत्रालयीन विभाग
१३.ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने
१४.निवड नस्ती (कार्यासन आस्था. ५), ग्रामविकास विभाग.

(ज्या दाखल्यासाठी स्वघोषणापत्राद्वारे मजकूर जाहीर करावयाचा आहे, त्या स्वघोषणापत्रातील शेवटचा परिच्छेद खालीलप्रमाणे नमूद करावा.) स्वयंघोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

स्वयंघोषणापत्र

मी ------------------------------ श्री. ------------------------------------------- यांचा मुलगा / मुलगी वय ------ वर्षे, आधार कार्ड क्रमांक. (असल्यास) --------------------- व्यवसाय ----------------------- राहणार -------------------------------------------- याद्वारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन . तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वंकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ------------------------ अर्जदाराची सही : ---------------------------

दिनांक : ------------------------- अर्जदाराचे नांव : ----------------------------

(The written declaration as given hereunder will be included at the end of the application form for seeking services.)

Applicant’s Photo

Self-Declaration

I _________________ Son/Daughter of _____________________________ aged ___, occupation ________________ resident of _______________________ with UID No. _________________________ hereby declare that the information provided above above is true and correct to the best of my personal knowledge, information and belief. I fully understand the consequences of giving false information. If the information is found to be false. I Shall be liable for prosecution and punishment under Indian Penal Code and / or any other law applicable thereto. Also all the benefits availed by me shall be summarily withdrawn.

Place : ________________ Applicant’s Signature ______________

Date : _________________ Applicant's Name :_________________

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक २६(२)] शनिवार, फेब्रुवारी १६, २०१९/माघ २७, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट,

मुंबई ४०० ००१, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक आरटीएस-२०१८/प्र.क्र. १४५/आस्था.५.—ज्याअर्थी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महा. अध्यादेश क्रमांक ५) च्या कलम-३ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार काढण्यात आलेल्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूचना क्रमांक आरटीएस-२०१५/प्र.क्र. ३२/पंरा-५, दिनांक १० जुलै २०१५ (यापुढे जिचा " उक्त अधिसूचना " असा उल्लेख करण्यात येत आहे.) द्वारे ग्रामविकास विभागामार्फत ग्रामपंचायतीद्वारे पात्र व्यक्तींना देण्यात यावयाच्या लोकसेवा आणि त्यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ अशा लोकसेवा देण्याकरिता विहित कालमर्यादेसह पदनिर्देशित अधिकारी आणि प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी अधिसूचित करण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, सेवा पुरविण्याचा कालावधी वाढविण्याबाबत महाराष्ट्र शासनास काही निवेदने प्राप्त झालेली आहेत, आणि त्याअर्थी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सेवा पुरविण्याचा कालावधी वाढविणे व काही सेवा वगळणे उचित असल्याचे शासनास वाटले आहे ;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. अधिनियम ३१) च्या कलम ३ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन सदर अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

सदर अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीऐवजी खालीलप्रमाणे अनुसूची प्रतिस्थापित करण्यात येत आहे :—

## अनुसूची

| अ. क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्यासाठीची कालमर्यादा (कामकाजाचे दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | जन्म नोंद दाखला | ७ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| २ | मृत्यु नोंद दाखला | ७ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ३ | विवाह नोंद दाखला | ७ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ४ | दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दाखला | ७ दिवस | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) |
| ५ | ग्रामपंचायत येणेबाकी नसल्याचा दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ६ | नमुना ८ चा उतारा | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ७ | निराधार असल्याचा दाखला | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पंडित जाधव,**

शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bhandhakam Bhavan, 25, Marzhaban Path,
Fort, Mumbai 400 001, dated the 12th February 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ACT, 2015.

No. RTS-2018/C.R. 145/Astha-5.—Whereas by Government Notification, Rural Development and Water Conservation Department, No. RTS-2015/CR-32/PR-5, dated the 10th July 2015, issued in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 3 of the Maharashtra Right to Public Services Ordinance, 2015 (Mah. ORD. No. V of 2015) (hereinafter referred to as " the said notification "), notified the public services rendered by the Rural Development and Water Conservation Department, through the Grampachayats to the eligible persons, and the suitable time limits for providing such public services, along with the Designated Officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended thereto, for the purposes of the said Ordinance ;

And whereas, the Government of Maharashtra has received the representation to enhance the time limits for providing certain public services and, therefore, the Government considers it expedient to enhance the said time limits and exclude certain services from the purview of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause by sub-section *(1)* of Section 3 of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (XXXI of 2015), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby amends the said notification as follows, namely :—

for SCHEDULE appended to the said notification, the following SCHEDULE shall be substituted, namely :—

*Schedule*

| Sr. No. | Public Service | Time limit for providing service (working days) | Designated Officer | First Appellate Officer | Second Appellate Officer |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Birth Certificate | 7 days | Gramsevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 2 | Death Certificate | 7 days | Gramsevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 3 | Marriage Certificate | 7 days | Gramsevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 4 | Below Poverty Line Certificate | 7 days | Assistant Block Development Officer | Block Development Officer | Deputy Chief Executive Officer (Panchayat) |
| 5 | No Dues Certificate | 5 days | Gramsevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 6 | Assessment Certificate | 5 days | Gramsevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |
| 7 | Certificate of Niradhar | 20 days | Gramsevak | Assistant Block Development Officer | Block Development Officer |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PANDIT JADHAV,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.

## Matter for Homepage of District Website

The Maharashtra Right to Public Services Act, 2015 is enacted and is in force since 28.04.2015 to ensure that notified services are provided to the citizens in a transparent, speedy and time-bound manner by various Government Departments and Public Authorities under the Government. Its objective is to provide easy, prompt and time bound services to the citizens.

The Maharashtra State Commission for Right to Public Service has been constituted under the above Act to monitor, coordinate, control and improve the public services being provided by the Government. The Commission consists of a Chief Commissioner and six Commissioners. The headquarter of the Commission is at the New Administrative Building, Opposite Mantralaya, Mumbai and the Divisional Offices of the Commissioners are at the six Divisional Headquarters.

If any notified service is not provided to any eligible person within stipulated time or is rejected without proper grounds, the concerned person may file 1st and 2nd appeals with the higher authorities and if he is not satisfied with their decision, he may prefer third appeal to the Commission. The erring officer is liable for a penalty up to Rs 5000/- per case.

Website of the Maharashtra State Commission for Right to Service is :-
https://aaplesarkar.mahaonline.gov.in



Scanned with OKEN Scanner

आपली सेवा आमचे कर्तव्य

# जिल्ह्याच्या संकेतस्थळावरील मुखपृष्ठासाठी मजकुर

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून तो दि. २८.०४.२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादित सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे.

वरीलप्रमाणे अधिसूचित सेवा नागरिकांना दिल्या जात आहेत किंवा नाही याबाबत देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व या संदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथे असून सहा विभागातील मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत.

पात्र नागरीकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरुद्ध संबंधितांना वरीष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते व तरीही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिकाऱ्यास प्रतिप्रकरण रु. ५०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची वेबसाईट खालीलप्रमाणे आहे :-
https://aaplesarkar.mahaonline.gov.in

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

# व

# महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाबाबतची संक्षिप्त माहिती

शासनाच्या विविध विभाग व प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या सेवा काही वेळा सामान्‍ नागरिकांपर्यंत पोहचत नाहीत किंवा त्या सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिकांना अनेकवेळा प्रयत्न करावे लागतात या परिस्थितीमध्ये आमूलाग्र बदल करण्यासाठी राज्याने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ह क्रांतिकारी कायदा केला आहे. नागरिकांना शासनाच्या अधिसूचित सेवा प्राप्त करुन घेण्याचा अधिकार देणार व प्रशासनाला जबाबदार व उत्तरदायी बनविणारा हा कायदा आहे. या कायद्यामुळे नागरिकांना तत्परतेने, विहि‍ कालावधीत सहज व सुलभपणे सेवा मिळणे शक्य होत आहे.

आतापर्यंत शासनाच्या विविध विभागांच्या पाचशेहून अधिक सेवा या कायद्यांतर्गत अधिसूचि करण्यात आल्या असून यापैकी सुमारे चारशे सेवा या "आपले सरकार पोर्टल" तसेच "आर.टी.एस. महाराष्ट्र या मोबाईल ॲपवर ऑनलाईन उपलब्ध आहेत. घरी बसून नागरिक त्या सेवा प्राप्त करु शकतात. तसे आपल्या गावातील "आपले सरकार सेवा केंद्रावर" जाऊन देखील या सेवांचा लाभ मिळू शकतो. व अधिसूचित सेवांची यादी प्रत्येक कार्यालयात दर्शनीभागी व संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याचे निर्दे आहेत. वरील प्रमाणे अधिसूचित सेवा दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्र ठेवण्यासाठी व यासंदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्याखाली "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून "आपली सेवा आमचे कर्तव्य" असे आयोगाचे ब्रीद वाक्य आहे. आयोगामध एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नविन प्रशासकीय भवन मंत्रालयासमोर, मुंबई येथे असून सहा विभागांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत. पा नागरीकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास त्या वरिष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते. तेथेही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करत येते. कसूरदार अधिकाऱ्यास रु. ५,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

याबाबतची अधिकची माहिती https://aaplesarkar.mahaonline.gov.in या संकेतस्थळाव उपलब्ध आहे.

Scanned with CamScanner

# जिल्हा परिषद सांगली

## सूचना फलक

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ मधिल तरतुदीनुसार अधिसूचित केलेल्या सेवा बाबत तपशिल.

कार्यालयाचे नाव – जिल्हा परिषद, सांगली.

विभाग – ग्रामपंचायत.

| अ. क्र. | अधिसूचित लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारित शुल्क | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म नोंद दाखला. | ७ दिवस | २०/- | ग्रामसेवक | सहा.ग.वि.अ. | ग.वि.अ. |
| २ | मृत्यू नोंद दाखला. | ७ दिवस | २०/- | ग्रामसेवक | सहा.ग.वि.अ. | ग.वि.अ. |
| ३ | विवाह नोंद दाखला. | ७ दिवस | २०/- | ग्रामसेवक | सहा.ग.वि.अ. | ग.वि.अ. |
| ४ | दारिद्र्य रेषेखालील दाखला. | ७ दिवस | निशुल्क | ग्रामसेवक | सहा.ग.वि.अ. | ग.वि.अ. |
| ५ | ग्रामपंचायत येणेबाकी नसल्याचा दाखला | ५ दिवस | २०/- | ग्रामसेवक | सहा.ग.वि.अ. | ग.वि.अ. |
| ६ | नमुना ८ चा उतारा | ५ दिवस | २०/- | ग्रामसेवक | सहा.ग.वि.अ. | ग.वि.अ. |
| ७ | निराधार असल्याचा दाखला | २० दिवस | निशुल्क | ग्रामसेवक | सहा.ग.वि.अ. | ग.वि.अ. |

टीप – सर्व सेवा व अर्जाचे नमुने ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहेत.

Scanned with CamScanner